CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३३२ वा | बुधवार दि. २७ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## दुकानदारांनी भानगडीत पडू नये, मराठी पाटी हवी: ठाकरे

**मुंबई ।** दुकानांवर २ महिन्यांत मराठी पाट्या लावा, असे आदेश महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने दिले



आहेत. त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पुन्हा मराठी पाट्यांवरुन व्यापाऱ्यांना सज्जड इशारा दिला आहे. महाराष्ट्रातल्या प्रत्येक दुकानावर आणि आस्थापनांवर ठळक मराठी भाषेतील पाटी हवी म्हणजे हवी. दुकानदारांनी नसत्या भानगडीत पडू नये आणि न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करावा, असे राज ठाकरे यांनी सुनावले आहे.

## न्यूज कॉलम

### मधमाशांच्या चाव्याने एकाचा मृत्यू

**धुळे ।** मधमाशांनी चावा घेतल्यामुळे बाळापूर येथील शेतकऱ्याचा मृत्यू झाला. किरण राजधर पाटीलअसे मृताचे नाव आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की दिनांक २५ सप्टेंबर रोजी दहा वाजेच्या सुमारास किरण राजधर पाटील नरेश राजधर पाटील दुर्गेश नरेश पाटील व त्यांचा मुलगा विनायक असे त्यांच्या आर्णी शिवारातील शेतात कामासाठी गेले होते.

### बसच्या धडकेत; दुचाकीस्वार ठार

**निजामपूर ।** निजामपूर-नंदुरबार रस्त्यावरील वाजदरे शिवारात असलेल्या भवानी मंदिरासमोर भरधाव एस.टी.बसने दूचाकीस्वारास धडक दिली. दीपक सुरेश चव्हाण रा.हेंकळवाडी, ता.साक्री यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२४ सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणे सहा वाजेच्या सुमारास दिलीप शांतीलाल चव्हाण (३३) रा.हेंकळवाडी, ता.साक्री हे त्यांचे ताब्यातील एम.एच.१८/बी. वाय.४२२७ क्रमांकाच्या दुचाकीने वाजदरे शिवारातील रस्त्यावरून जात असतांना एस.टी.बस. क्र.एम. एच.२०/बी.एल.३३८६ ने जोरदार धडक दिली. या अपघातात दिलीप चव्हाण गंभीर जखमी होवुन मरण पावले. एस.टी.बसचालक घटनास्थळावरून पसार झाला.

# सरकारनं कांदा निर्यात शुल्क मागे घ्यावे; शरद पवारांची मागणी



### कांदा निर्यात शुल्क मागे घ्यावे...

**शरद पवार पुढे म्हणाले की, आज मंत्रिमंडळाची बैठक होत असून या बैठकीत मंत्री पियुष गोयल हे उपस्थित असणार आहेत. पीयूष गोयल यांनी कांदा प्रश्नावर आजच निर्णय घ्यावा, शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, शेतकऱ्यांना वेठीस धरू नये, अशी मागणी शरद पवार यांनी यावेळी केली. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून कांदा प्रश्न चांगलाच पेटला असून या प्रश्नावर सकाळी मंत्रालयात बैठक घेण्यात आली. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कांदा व्यापाऱ्यांना सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले असून सायंकाळी पुन्हा पियुष गोयल यांच्या उपस्थितीत या प्रश्नावर चर्चा केली आहे. तत्पर्वी शरद पवार यांनी सरकारकडे कांद्यावरील निर्यात शुल्क मागे घेण्याची विंनती केली असल्याने आजच्या बैठकीत नेमका काय निर्णय होतो हे पाहावे लागणार आहे.**

### त्यांचे विधान क्लेशदायी

**'महिला आरक्षण इतक्या वर्षात लागू करता आलं नाही, अस म्हणणं चुकीचं आहे. १९९३ साली माझ्याकडे महाराष्ट्राची सूत्रे होती. मी मुख्यमंत्री असताना जून १९९३ मध्ये महिला आणि बाल विकास महाराष्ट्रात पहिल्यांदा स्वतंत्र विभाग सुरु केला, असे शरद पवार यांनी सांगितले. १९९३ मध्ये घटनादुरुस्ती झाली. त्यावेळी देशभरात महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एक तृतीयांश आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महिलांसाठी आरक्षण लागू झाले. २२ जून १९९४ ला महाराष्ट्राने पहिलं महिला धोरण जाहीर केलं. या धोरणातून महाराष्ट्रात सरकारी, निम सरकारी विभागातील महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात आले. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला. असा निर्णय महाराष्ट्राने पहिल्यांदा घेतला, अशी भूमिका पवारांनी मांडली.**

### मोदी सांगतात ते वास्तव नाही

**केआर नारायणन हे देशाचे उपराष्ट्रपती होते. त्यांच्या उपस्थित नेहरू सेंटरमध्ये आरक्षणाचा निर्णय सांगण्यासाठी एक संमेलन आयोजित केलं होतं. २२ जून १९९४ ला महाराष्ट्राने देशात पहिलं महिला धोरण जाहीर केलं. त्यातूनच महाराष्ट्रात सरकारी निमसरकारी विभागत महिलांसाठी तीन टक्के आरक्षण ठेवलं. नंतर स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण दिलं. असं करणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य. मी मुख्यमंत्री असताना महिलांचे हे निर्णय घेतले. मोदी सांगतात या देशात असा विचार केला नाही. हे वास्तव नाही, असंही ते म्हणाले.**

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुंबईत पत्रकार परिषदेला संबोधित केलं. यावेळी शरद पवार यांनी महिला आरक्षण विधेयक आणि कांदा निर्यात शुल्कासंदर्भात भाष्य केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल एके ठिकाणी भाषण करत असताना संसदेमध्ये महिलांच्या आरक्षणाच्या संबंधीचा जो निर्णय एकमताने घेतला. या निर्णयाच्या संबंधी दोन सदस्य सोडले तर संसदेच्या कुठल्या सदस्यांनी विरोध केला नव्हता. घटनात्मक दुरुस्तीचा निर्णय घेत आहे, त्यामध्ये एससी, एसटी महिलांना संधी आहे तशी ओबीसी महिलांना संधी द्यावी, तशी तरतूद करावी, अशी विनंती होती. पण, एकमतानं तो निर्णय झाला, असं शरद पवार म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बोलताना काँग्रेस आणि काही पक्षांनी नाईलाजानं पाठिंबा दिल्याचं म्हटलं. इतक्या वर्षात काही केलं नाही, असं ते म्हणाले. पण तसं नाही म्हणत शरद पवार यांनी त्यांच्या कार्यकाळात महिलांसाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली.

शरद पवार पुढं म्हणाले की, १९९३ साली माझ्याकडे महाराष्टराची सूत्रं होती. राज्य महिला आयोग स्थापन करणारं महाराष्ट्र राज्य हे पहिलं राज्य होतं. मी मुख्यमंत्री असताना जून १९९३ मध्ये महाराष्ट्रात महिला व बालविकास हा स्वतंत्र विभाग सुरु केला. २४ एप्रिल १९९३ रोजी ७३ वी घटनादुरुस्ती झाली त्या दुरुस्तीची अमंलबजावणी सुरु झाली आणि देशभरात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था सुरु झाली. घटनेचं २४३ ड कलम लागू झालं. देशात स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांना आरक्षण द्यावं, हा कायदा पास झाला आणि नगरपालिका, महानगरपालिका या शहरी भागातही महिलांसाठी आरक्षण लागू झालं, असं शरद पवार म्हणाले.के. आर. नारायणन हे देशाचे उपराष्ट्रपती होते. नेहरु सेंटरला महिला संघटनांसाठी मोठं संमेलन आयोजित केलेलं होतं. २२ जून १९९४ ला देशात पहिलं महिला धोरण लागू केलं. यातूनच सरकारी आणि निमसरकारी नोकरीत, स्थानिक स्वराज्य संस्थात नोकरीत महिलांना आरक्षण लागू करण्यात आलं. हे निर्णय घेणारं महाराष्ट्र पहिलं राज्य होतं, असं शरद पवार यांनी सांगितलं. महिला आरक्षणासंदर्भात देशात कुणीही विचार केला नाही, असं मोदी सांगतात हे वास्तव नाही. संरक्षण मंत्री असताना आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्समध्ये महिलांना राखीव जागा ठेवल्या, असं शरद पवार म्हणाले. या सगळ्या गोष्टी काँग्रेस सरकार सत्तेत असताना झाल्या. दुर्दैवानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना याबाबत ब्रीफिंग झालं नसावं, असं शरद पवार म्हणाले. दरम्यान, शरद पवार यांनी केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर लावलेलं निर्यात शुल्क रद्द करावं, असं म्हटलं आहे.

## धनगर समाजाचे २१ दिवसांनंतर उपोषण मागे



### गिरीश महाजन यांची शिष्टाई यशस्वी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगरच्या चौंडी येथे गेल्या २१ दिवसांपासून धनगर समाजाचं सुरु असलेलं उपोषण आज अखेर मागे घेण्यात आलं आहे. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावं, अशी उपोषणकर्ते सुरेश बंडगर आणि अण्णासाहेब रुपनवर यांची मागणी आहे. याच मागणीसाठी गेल्या २१ दिवसांपासून त्यांचं उपोषण सुरु होतं. या दरम्यान, सरकारकडून अनेकदा चर्चेचे प्रयत्न करण्यात आले. पण या चर्चांमधून तोडगा निघत नव्हता. उपोषणकर्त्यांची या काळात प्रकृती देखील ढासळली. त्यांनी उपचार घेण्यासही नकार दिला होता. अखेर मंत्री गिरीश महाजन यांनी याप्रकरणी दुसऱ्यांदा चौंडी येथे जावून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्यांचा हा प्रयत्न यशस्वी ठरला आहे.

गिरीश महाजन आज चौंडीत दाखल झाले. त्यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन करुन उपोषणकर्ते आणि मुख्यमंत्री यांच्यात बोलणं घडवून आणलं. मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्यांची समजूत काढली. यावेळी उपोषणकर्त्यांनी लेखी आश्वासन मागितलं. सरकार लेखी आश्वासन देण्यास तयार झालं. त्यामुळे उपोषणकर्त्यांनी आपलं उपोषण मागे घेतलं, अशी माहिती समोर आलीय.धनगर समाजाचे प्रतिनिधी आणि सरकार यांच्यात २१ सप्टेंबरला सह्याद्री अतिथीगृहावर बैठक झाली होती. राज्य सरकारने एकमताने त्यांना पाठिंबा दिला होता. तुमची मागणी रास्त आहे. राज्य सरकारचा निश्चितच पाठिंबा आहे. काही तांत्रिक अडचणी आहेत. काही गोष्टी न्यायप्रविष्ट आहेत. त्या अडचणी सोडवण्याच्या दृष्टीने सरकार गंभीर आणि कटिबद्ध आहे, अशी प्रतिक्रिया गिरीश महाजन यांनी दिली. मंत्री गिरीश महाजनांनी चौंडीतील आंदोलनाला वारंवार भेटी दिल्या आहेत. त्यांनी रुग्णालयात जाऊन उपोषणकर्त्यांची भेटही घेतल्या आहेत.

## गोणीत महिलेचा मृतदेह आढळला

### नाशिमधील घटनेने उडाली खळबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील दिंडोरी रोडवर असलेल्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाजवळील रस्त्याच्या लगत एका गोणीत महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून या घटनेचा तपास करत आहेत. महिलेचा मृतदेह आढळून आल्याने अनेक तर्क - वितर्क लावले जात आहेत. मात्र पोलिसांकडून हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

नाशिकच्या म्हसरुळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडल्याचे समोर आले आहे. आज सकाळी नाशिकच्या दिंडोरी रोडवर गोणीत एका महिलेचा मृतदेह पडलेला होता. परिसरातून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधी येत असल्याने नागरिकांनी चौकशी केली त्यावेळी रस्त्याच्या कडेला एका गोणीत गवतामध्ये हा संशयितरित्या मृतदेह आढळून आला. यानंतर याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेहाचा पंचनामा करत घटनेच्या तपासात सुरुवात केली आहे. पोलिसांना हत्या झाल्याचा अंदाज आहे. मात्र महिलेचा मृतदेह गोणीत आढळून आल्याने महिलेची हत्या आहे की आणखी काही या मागचे कारण अद्याप समोर आलेलं नाही. त्यामुळे महिलेच्या मृतदेहामागील गूढ समोर आलेले नाही. त्यानुसार पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. मात्र हा मृतदेह कोणत्या महिलेचा आहे याची देखील ओळख पटू शकलेली नाही. कांदे बटाटे भरण्याच्या जाळीदार गोणी सदर मृतदेह टाकण्यात आला होता तसेच त्या ठिकाणी काही कपडे देखील पोलिसांना मिळून आले आहे. तसेच मृतदेहावर अळ्या पडण्यास देखील सुरुवात झाली आहे. त्यामुळे मृतदेह हा कुजण्यास सुरुवात झाली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू पाचोरकर यांनी दिली आहे.

## पुरातन विहीर पुरुन त्यावर होणारे बांधकाम थांबवा; धनगर समाज आक्रमक



**धुळे । प्रतिनिधी**

शिरपूर शहरातील गांधी मार्केटमधील पुरातन पायविहीर बेकायदेशिररित्या पुरवुन त्याजागी बांधकाम करणार्यावर कायदेशिर कारवाई करण्यात यावी अन्यथा जनआंदोलन छेडले जाईल, असाइशारा धुळे जिल्हा सकल धनगर समाज, महाराष्ट्र धनगर समाज महासंघ, धुळे जिल्हा मल्हार सेनेतर्फे धुळे जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनासह उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गुजराथी (वाणी) पंच मंडळ, शिरपूर व अविनाश पोपटलाल शहा, तेजस कन्स्ट्रक्शन रा.शिरपूर यांनी शिरपूर शहरातील गांधी मार्केटमधील सि.स.नं.१८ मधील पुरातन पायविहीर बेकायदेशिररित्या पुरवुन नष्ट केली. त्याजागी आता बांधकाम करण्यात येणार आहे. मात्र सदर पायविहीर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बारा ज्योतिर्लिंगाच्या जलअर्पणासाठी तसेच सर्वसामान्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी या उद्देशाने बांधली होती. सदरच्या विहीरीवर अविनाश पोपटलाल शहा हे इतर इसमांच्या तसेच जेसीबीच्या सहाय्याने बेकायदेशिररित्या बुजवुन त्यावर अनधिकृत बांधकाम करण्याच्या तयारीत आहेत. परिणामी, शिरपूर शहरातील नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावत असल्याने शहरातील वातावरण दुषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीतांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा धनगर समाज नाईलाजास्तव पुढील मार्ग पत्करेल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर सुनिल वाघ, गोरखराव पाटील, ज्ञानेश्वर मासुळे, योगेश पाकळे, समाधान धनगर, अमोल मासुळे, मुकेश थोरात, निंबा लांडगे, मनोज धनगर, सुनिल धनगर, सोमनाथ धनगर, संजय धनगर, दीपक धनगर यांची नावे व स्वाक्षर्या आहेत.

## मोटारसायकलच्या डिक्कीतून १.७ लाख लंपास

**धुळे ।** शहरातील सुंदर सुपर मार्केटसमोर भररस्त्यात मोटारसायकलच्या डिक्कीतून १ लाख ७० हजार रुपये लंपास केल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस दाखल झाले असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून चोरट्याचा शोध घेतला जात आहे. तालुक्यातील काशीपूर येथील शेतकरी जिभाऊ आबा मारनर (५०) हे लाकडांचाही व्यवसाय करतात. त्यांनी १० हजारांची रोकड त्यांनी वरच्या खिशात ठेवली व उर्वरित १ लाख ७० हजार रुपयांची रोकड मोटारसायकल (एमएच १८/४९२८) च्या डिक्कीत एका पिशवीत ठेवली. बसस्थानककडून जात असताना सुंदर सुपर मार्केटजवळ वाहतूक ठप्प झाल्याने ते थांबले होते. यावेळी गर्दीचा फायदा घेत एका पायी जाणार्या चोरट्याने त्यांच्या डिक्कीतून पैशांची पिशवी गायब केली.




## नेते, वारसदार, इच्छुकांची आरतीला उत्स्फूर्त हजेरी

**धुळे । पुरुषोत्तम पाटील**

### आजी-माजी नगरसेवकांची धांदल

**शहरातही बाप्पाच्या उत्सवात आजी-माजी नगरसेवकांसह इच्छुकांची धांदल दिसत आहे. प्रभागात अनेक दिवसांपासून तयारी केलेल्या इच्छुकांना आरतीला आणण्यासाठी मंडळांचे कार्यकर्ते कामाला लागले असून, संबंधितांच्या तारखांचे बुकिंगही केले आहे. एकूणच मंडळे आपल्या बाजूला करून घेण्यासाठी इच्छुकही वाटेल ती किंमत मोजायला तयार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**

### कट्टर विरोधकही एकत्र

**निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी मतदारसंघातील प्रत्येक गावात जाऊन गणेश मंडळाच्या पदाधिका-यांशी संपर्क करून सर्व प्रकारचे सहकार्य केले आहे. शहरात एका वर्षात घडलेल्या राजकीय घडामोडींबाबत मतदारांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू असून त्याचा परिणाम पालिका निवडणुकीवर होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. राजकीय क्षेत्रातील कट्टर विरोधक अचानक एकत्र आल्यामुळे त्यांच्या समर्थकांचा गणेशोत्सवातील सहभाग वाढला आहे.**

सार्वजनिक तरुण मंडळांच्या आरतीला संधी मिळावी व मिरवता यावे यासाठी नेते, वारसदार, तसेच निवडणुकीसाठी इच्छुक मोठ्या देणग्या देत आरतीचा मान मिळवत आहेत. त्यामुळे मंडळ एक व आरती करणारे अनेक अशी स्थिती असून, उत्स्फूर्तपणे पुढाऱ्यांची आरतीला हजेरी दिसत आहेत. लागले आहेत. राजकारणच मुळात तरुण मंडळांच्या उत्स्फूर्त सहभागावर अवलंबून असल्याने 'दिल खोल के' असा पवित्रा पुढाऱ्यांनी सोडला आहे.

मंडळांच्या विविध बाबींचा खर्च उचलण्याबरोबरच महाप्रसादाला लागेल ते देण्यापर्यंतची आर्थिक बाजू त्यांनी उचलल्याने मंडळांचा आनंदही द्वीगुणीत झाला आहे. ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे न्यायालयात अडकलेले घोंगडे आता पावसाळा संपल्याने कोणत्याही क्षणी सुटेल याची जाणीव असल्याने नेते, वारसदार, कार्यकर्ते, इच्छुक कामाला लागले आहेत. राजकारणच मुळात तरुण मंडळांच्या उत्स्फूर्त सहभागावर अवलंबून असल्याने 'दिल खोल के' असा पवित्रा पुढाऱ्यांनी सोडला आहे. मंडळांच्या विविध बाबींचा खर्च उचलण्याबरोबरच महाप्रसादाला लागेल ते देण्यापर्यंतची आर्थिक बाजू त्यांनी उचलल्याने मंडळांचा आनंदही द्वीगुणीत झाला आहे. आरतीसाठी आर्थिक सुबत्ता असणाऱ्यांना पायघड्या घातल्या जात आहेत. रोख पावतीबरोबरच कायमस्वरूपी लागणाऱ्या साहित्याची मागणी मंडळांकडून होत आहे. आमदार, खासदार, सरपंचांपर्यंत सर्वच मंडळींना बाप्पाच्या आरतीने उजळून काढले जात आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे युवक तसेच सार्वजनिक मंडळांचे संस्थापक सदस्य नेतृत्व करीत आहेत. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यामुनिवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले असल्यामुळे मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न गणेशोत्सवाच्या माध्यमातून केला जात आहे.

## ऋण काढून सण नको!

जगात दरडोई कमी उत्पन्न असतानाही बचतीची सवय अंगी मुरलेले जे देश आहेत; त्यात भारत अग्रभागी आहे. सर्वसामान्य भारतीय माणूस उधळ्या वृत्तीचा किंवा हातात आलेला सगळा पैसा खर्चून टाकणारा नाही. तो चार पैसे मिळाले, तर त्यातला एक पैसा मागे राखायचा प्रयत्न करतो. त्याची ही सवयच मॅक्रो अर्थकारणाला स्थैर्य देत असते.

गेल्या वर्षीचे जे आकडे प्रकाशित झाले होते, त्यानुसार सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या म्हणजे जीडीपीच्या २९.८४ टक्के इतकी बचत भारत करीत होता. त्याचा हा क्रमांक जगात एकोणिसावा होता. मात्र, अनेक विकसित तसेच युरोपीय देश या निकषावर भारताच्या बरेच मागे होते. आता भारताची गेल्या आर्थिक वर्षातील निव्वळ घरगुती बचत ५५ टक्क्यांनी घसरून ५.१ टक्केच झाल्याची आकडेवारी प्रकाशित झाली आहे. हा गेल्या पन्नास वर्षांतील नीचांक असल्याचेही म्हटले जाते. प्रचंड बचत करणारा भारतीय माणूस आणि भारतीय कुटुंबे अशी का वागत आहेत, हा अर्थशास्त्रज्ञांपुढचा एक प्रश्न ठरू शकतो. त्याची उत्तरे शोधावी लागतील.

ही कमी झालेली बचत समजावून घेण्यासाठी आणखी दोन आकडेवाऱ्या पाहणे योग्य ठरेल. एकतर, एरवी बचतीसाठी वापरला जाणारा फार मोठा हिस्सा मालमत्तांच्या खरेदीसाठी खर्ची पडल्याचे आकडेवारी दाखवत आहे. ही एका परीने चांगली खूण आहे. स्थावर किंवा जंगम मालमत्तांची खरेदी ही एका प्रकारे गुंतवणूकच असते. गुंतवणूक ही बचतीशिवाय होऊ शकत नाही आणि तिचे पुन्हा रूपांतर बचतीमध्ये करणे शक्य असते. तेव्हा हा मुद्दा फार काळजीचा मानायचे कारण नाही. दुसरा मुद्दा मात्र काहीसा काळजी करण्याचा आहे. मागच्या आर्थिक वर्षात भारतीय कुटुंबांवर एकत्रितपणे ८.२ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर असल्याचे 'एसबीआय रिसर्च'चा अहवाल सांगतो. कर्ज हीसुद्धा गुंतवणूक असते आणि कर्जातून उभ्या राहणाऱ्या उद्योगांमधून नवी धननिर्मिती होत असते. मात्र, ही कर्जे केवळ गृहोपयोगी किंवा चैनीच्या वस्तू घेण्यासाठी घेतली गेली तर ती फेडण्यासाठी निश्चित, खात्रीचे उत्पन्न असणे आवश्यक असते. तसे ते नसेल, तर या कर्जांचा बोजा कुटुंबांचे अर्थस्वास्थ्य बिघडवू शकतो. तसे नेमक्या किती कुटुंबांच्या बाबतीत झाले आहे, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

वरील कर्जबाजारीपणामध्ये एक कधीही सांगितली न जाणारी किंवा लपून राहणारी बाब आहे. काही काळापूर्वी एक आकडेवारी प्रकाशित झाली होती. तिच्यानुसार दर भारतीयाचे सरासरी दरमहा उत्पन्न एक हजार ६६१ रुपये होते. त्याच काळात प्रत्येक भारतीयाचा दारूवरचा दरमहा सरासरी खर्च एक हजार ९३८ रुपये होता. याच काळात देशातल्या सर्व राज्यांचे अबकारी कर उत्पन्न वाढलेच होते. मात्र, दारूवरच्या वाढत्या खर्चामुळे देशात गरीब कुटुंबांवरचा कर्जाचा भार वाढतो आहे. कर्जाचा वाढता भार, याचाच दुसरा अर्थ उणावत जाणारी बचत. दारूवर रोज अब्जावधी रुपये खर्च करणारी लाखो गरीब कुटुंबे बचत न करता कर्जाच्या विळख्यात सापडत आहेत. मात्र, या रोगाकडे एकही सरकार गंभीरपणे लक्ष देणार नाही, हे उघडच आहे. भारतीयांची बचत कमी होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण सोप्या वाटणाऱ्या हप्त्यांवर होणारी प्रचंड खरेदी हेही असल्याचे उघड झाले आहे. पूर्वी आधी बचत करायची आणि नंतर जमेल तशी वस्तू विकत घ्यायची, अशी मध्यमवर्गीय तसेच मध्यममार्गी रीत होती. ती आता बरोबर उलटी झाली आहे. आधी खर्च करा आणि नंतर कमवा किंवा नंतर फेडा, या कर्ज आणि व्याजाधारित बाजार व्यवस्थेमुळे खिशातली निव्वळ बचत कमी होत चालली आहे. अशा प्रकारे होणारा खर्च सामान्य नागरिकांना कितपत महाग पडतो, याचा नेमका हिशेब अनेकदा मांडला जात नाही. या ताज्या पाहणीत घरे आणि गृहोपयोगी वस्तूंच्या कर्जाचा आकडा ७.१ लाख कोटी रुपयांच्या घरात गेल्याचे दिसते आहे. यातील घरांची खरेदी ही एक प्रकारे गुंतवणूक मानता येते. गृहबांधणी उद्योगातून अर्थकारणाला अनेक प्रकारे चालनाही मिळत असते. मात्र, इतर कर्जे घेताना आपण चंगळवादी सापळ्यात तर सापडत नाही ना, याचा विचार सर्वांनी करायला हवा. प्रत्येक उत्पादक आणि विक्रेता त्याचा माल विकायला बसलेलाच असतो. मात्र, आपला खिसा आणि आपली नेमकी गरज यांची सांगड प्रत्येकाला जागृत ग्राहकाच्या भूमिकेत शिरून घालता आली पाहिजे. ऋषी चार्वाकाने 'ऋणं कृत्वा घृतं पीबेत' असे म्हटल्याचे नोंदले गेले आहे. म्हणजे, कर्जे काढा आणि तूप प्या. थोडक्यात, कर्जे काढून हवी ती चैन करा. पण अशी चैन आधी बचत संपवेल आणि नंतर कर्जबाजारी करेल. यापेक्षा 'ऋण काढून सण करू नका' हा सल्ला अधिक महत्त्वाचा आहे. नव्या पाहणीचा तोच संदेश आहे.

# भारतीय उद्योग-व्यापारासाठी नवी कवाडे

'भारत-मध्यपूर्व-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर' चीनच्या 'बीआरआय' उपक्रमाला समर्थ पर्याय ठरू शकतो. यात विस्तृत युरेशियन उपखंड दळणवळणाने जोडण्यासाठी रेल्वेमार्ग आणि सागरी मार्गाचा समावेश असेल. याच सुमारास सरकारने भारतीय कंपन्यांना 'इंटरनॅशनल फायनॅन्शियल सर्व्हिसेस सेंटर'मधील एक्सचेंजवर सूचीबद्ध करण्याची परवानगी दिल्यामुळे देशांतर्गत कंपन्या जागतिक बाजारात पोहोचून चांगले मूल्यांकन मिळवू शकतील.

जी-२० परिषद राजकीयदृष्ट्या यशस्वी झाली असली तरी देशाच्या दृष्टिकोनातून आर्थिकदृष्ट्याही अनेक गोष्टी साध्य झाल्या. भारत, पश्चिम आशिया आणि युरोप यांना जोडणारी दळणवळण मार्गिका यावेळी घोषित करण्यात आली. त्याला अधिकृतपणे 'भारत-मध्यपूर्व-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर' असे म्हटले गेले. पंधराव्या शतकापूर्वी आशिया, आफ्रिका आणि युरोप मसाल्यांच्या मार्गाने जोडले गेले होते. नव्या मार्गिकेलाही 'एकविसाव्या शतकातील मसाल्यांचा मार्ग' असे संबोधन मिळाले आहे. चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनशिएटिव्ह'ला समर्थ पर्याय म्हणून याकडे पाहिले जात आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात युरेशियन उपखंडाच्या विस्तृत प्रदेशाला दळणवळणाने जोडण्यासाठी रेल्वेमार्ग आणि सागरी मार्गाचा समावेश असेल. या प्रक्रियेमध्ये डिजिटल संपर्क व्यवस्था सुधारण्याला आणि ग्रीन हायड्रोजनसारख्या ऊर्जा उत्पादनांसह देशादेशांमधील व्यापाराला चालना मिळेल. त्यासाठी अरबी द्वीपकल्पातून रेल्वेमार्ग टाकला जाईल. पुढे या प्रस्तावित मार्गिकेची दोन्ही टोके भारत आणि युरोपमधील सागरी मार्गांना जोडण्याची कल्पना आहे. भारत, संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, युरोपीय महासंघ, फ्रान्स, इटली, जर्मनी आणि अमेरिका यांच्यातील दळणवळण आणि पायाभूत सुविधांमधील सहकार्याच्या दृष्टीने हा पहिलाच ऐतिहासिक उपक्रम असेल.

आता भारताकडून जी-२० समूहाचे यजमानपद ब्राझिलकडे गेले आहे. उपासमार, गरिबी आणि हवामान बदलाच्या मुद्द्यावर जागतिक सहकार्य निर्माण करण्याचे काम आपण करू, असे ब्राझिलचे अध्यक्ष लुईज इन्सियो लुला दा सिल्वा यांनी म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार-उद्योगात भारताची दखल घेतली जाणे हे सुलक्षणच म्हटले पाहिजे. या कॉरिडॉरची घोषणा आता करण्यात आली असली, तरी त्यावर खूप अगोदरपासून काम सुरू होते. हा कॉरिडॉर केवळ व्यापारी उद्देशाने जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे आर्थिक एकात्मता आणि शाश्वत विकासाला चालना मिळणार आहे. त्याला 'इंडिया मिडल ईस्ट इकॉनॉमिक कॉरिडॉर' (आयएमईसीसी) असे नाव देण्यात आले आहे. याच्या बांधणीमुळे 'जागतिक व्यापाराचा भूगोल' बदलून जाईल. हा शेकडो अब्ज डॉलर्सचा प्रकल्प आहे. चीनने २०१३ मध्ये कझाकिस्तानमध्ये 'बीआरआय' प्रकल्पाची घोषणा केली होती. पूर्व आशिया आणि युरोपला जोडणे हा त्याचा उद्देश होता. मसाल्यांच्या व्यापारासाठी युरोपला जाण्यासाठी भारत या मार्गाचा वापर करायचा. चीनचा 'बीआरआय' हा मार्ग पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्यामुळे भारताची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता आहे. अनेक देशांचा सहभाग असूनही 'बीआरआय' एकतर्फी आहे. त्यात चीन हा मुख्य गुंतवणूकदार आहे, तर इतर देश प्राप्तकर्ते आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून चीनने पाकिस्तान, श्रीलंका, केनिया, झांबिया, लाओस यांसारख्या गरीब देशांसाठी कर्जाचा सापळा रचला आहे, जे कर्ज घेतात; परंतु फेडू शकत नाहीत.

पाकिस्तानने निर्माण केलेल्या अडथळ्यांमुळे भारत पश्चिम आशिया आणि युरोपसोबत आर्थिक कॉरिडॉर विकसित करू शकला नाही. या पार्श्वभूमीवर मोदी यांनी जाहीर केलेल्या नव्या कॉरिडॉरमध्ये सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि युरोपियन संघाचा समावेश होतो. या देशांकडे गुंतवणुकीसाठी भरपूर पैसा आहे. दरम्यान, सौदी अरेबियाच्या चीन आणि रशियासोबतच्या वाढत्या संबंधांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच इस्रायल आणि सौदी अरेबियाला जवळ आणण्यासाठी अमेरिका या प्रकल्पाचा वापर करू शकते. या कॉरिडॉरमधून भारताला अधिक सामरिक फायदे मिळतील. चीनने 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' (सीपीईसी) आणि 'बीआरआय'च्या माध्यमातून भारताला सामरिकदृष्ट्या घेरण्याचा प्रयत्न केला आहे. आता या कॉरिडॉरच्या निर्मितीनंतर भारताला चीनच्या त्या वर्तुळातून बाहेर पडता येणार आहे. इंडिया मिडल ईस्ट इकॉनॉमिक कॉरिडॉरच्या निर्मितीनंतर भारत होर्मुझ सामुद्रधुनी, सुएझ कालवा आणि बाब अल मंधब सामुद्रधुनीवर मुक्तपणे संचार करू शकेल. जगातील एक तृतीयांश तेल आणि वायूची निर्यात होर्मुझ सामुद्रधुनीतून होते आणि भारताच्या इंधन सुरक्षेसाठी हा एक निर्णायक मार्ग आहे. या प्रकल्पामुळे भारताचे परराष्ट्र धोरण अधिक आक्रमक होईल.


दुसरीकडे, मार्च २०२३ नंतर परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात पुन्हा एकदा गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे. देशातील सकल राष्ट्रीय उत्पादनाचे वाढलेले आकडे आणि अमेरिकेच्या मध्यवर्ती अशा फेडरल रिझर्व्हने व्याजदराबाबत धारण केलेली सौम्यता यांचाही हा परिणाम आहे. विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार आपल्याकडे सातत्याने खरेदी करत आहेत. सध्या चीन, दक्षिण कोरिया आणि तैवानच्या बाजारपेठेतील शेअर मूल्यांकन अतिशय आकर्षक आहे; परंतु भारतातही इतरांना गुंतवणूक करावीशी वाटत आहे. भारतीय बाजारपेठेत गुंतवणूक करणाऱ्या सर्वात जास्त पोर्टफोलिओ असणाऱ्या गुंतवणूकदारांपैकी सिंगापूर हा देश आहे. सिंगापूरमधील खासगी संस्था भारतीय भांडवली बाजारात आकर्षित झाल्या आहेतच; परंतु स्वतः सिंगापूर सरकारही इथल्या शेअर बाजारात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करत असते. या पार्श्वभूमीवर, नरेंद्र मोदी सरकारने भारतीय कंपन्यांना अहमदाबादमधील 'इंटरनॅशनल फायनॅन्शियल सर्व्हिसेस सेंटर' (आयएफएससी)मधील एक्सचेंजवर सूचीबद्ध करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे देशांतर्गत कंपन्या जागतिक बाजारात पोहोचू शकतील आणि त्यांचे चांगले मूल्यांकन होऊ शकेल.

मे २०२० मध्ये सरकारने प्रथमच भारतीय कंपन्यांना परदेश अधिकार क्षेत्रात थेट सूचीबद्ध करण्याची कल्पना मांडली होती. सुरुवातीला भारतीय कंपन्यांना आयएफएससीवर सूचीबद्ध करण्याचा रस्ता मोकळा करून नंतर त्यांना सात किंवा आठ देशांमधील शेअर बाजारांमध्ये आपल्या कंपनीचे समभाग सूचीबद्ध करण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज, नॅसडॅक, लंडन स्टॉक एक्सचेंज तसेच हाँगकाँग, जपान, दक्षिण कोरिया, फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड आणि कॅनडाच्या स्टॉक एक्सचेंजवर भारतीय कंपन्यांना आपले समभाग सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव दिला गेला होता. या सर्व देशांमधील मनी लाँडरिंगविरोधी नियम कठोर आहेत. भारतातील काही बड्या कंपन्या मनी लाँडरिंग कसे करतात, हे अलीकडील काळात वारंवार समोर आले आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित धोरण युनिकॉर्न किंवा एकूणच स्टार्ट अप कंपन्यांसाठी वरदान ठरू शकते. कारण या कंपन्यांना भांडवलाची अधिक गरज असते. मात्र सदर योजनेला देशांतर्गत विरोध होऊ शकतो आणि यातून करचुकवेगिरी वाढेल, अशी शंकाही काहीजणांना वाटते. सध्याच्या नियमांप्रमाणे भारतीय कंपन्यांचे शेअर ओव्हरसीज एक्सचेंजवर थेट सूचीबद्ध होऊ शकत नाहीत. त्यांना डिपॉझिटरी रिसीट्सच्या माध्यमातूनच परदेशी एक्सचेंजवर सूचीबद्ध होता येते.

इथे काही बाबी लक्षात घ्यायला हव्यात. एखादी देशी कंपनी विदेशात सूचीबद्ध होते, तेव्हा तिच्यावरील सरकारी नियंत्रण कमी होण्याची शक्यता असते. भारतातील पैसा परदेशात न्यायचा आणि तिथे कागदोपत्री बोगस कंपन्या स्थापन करून पुन्हा भारतात आणायचा. काळ्या पैशाचे रूपांतर पांढऱ्या पैशात करायचे, हे उद्योग आपल्याकडे मोठ्या प्रमाणात चालतात. जगात टॅक्स हेवन असलेल्या देशांमध्ये हे उद्योग खूप चालतात. त्यामुळे नियंत्रण व्यवस्था चांगली असलेल्या देशांमध्ये कंपन्यांना थेट सूचीबद्ध करून भांडवल उभारण्यास परवानगी देण्याचा सरकारचा विचार होता; परंतु त्याबाबत आता अत्यंत धिम्या गतीने पावले टाकण्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी ठरवलेले दिसते. त्यामुळे अगोदर आयएफएससीच्या मार्गाने गुंतवणूक करण्यास परवानगी द्यायची आणि नंतरच टप्प्याटप्प्याने देशी कंपन्यांना विदेशी अवकाश मोकळा करून द्यायचा, असे सरकारचे धोरण दिसते.

**- हेमंत देसाई: ज्येष्ठ पत्रकार**

## जागतिक पर्यटन दीवस





जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे. जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन २७ सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता.जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते. आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्र्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते.त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू,वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल.त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात.आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टनयेथील हाऊदी मोदीकार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात.ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला वाचविले पाहिजे.वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान,भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक,वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे.जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार,ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे.आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.भारतात पर्यटन स्थळी देव-दानव,ऋषि-मुनी,साधु-संत, वेषभुषा, पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा व क्रांतीकारकांचा इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये.यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.याला नाकारता येत नाही.सरकारने स्वत:चे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा फायदा आहे.यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे.भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला)पर्यटनसिटीम्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आज संपूर्ण विश्र्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोरे येण्याची गरज आहे.यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल,प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल.



**रमेश लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.९९२१६९०७७९**

**- क्रमशः**

## शब्दकोडे-१८९



**आडवे शब्द**

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस ३. चामखीळ ४. पराजय ७. कौसल्यापुत्र ९. कर्ज देणारा १०. नवरदेवाकडील मंडळी १२. पंख १३. कपडालत्ता १६. तापविणारा सूर्य १८. गुजराथी नृत्यप्रकार १९. झोपडी २०. भांडण २१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी २३. चप्पल २४. लवकर, वेगाने २६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु २७. बारा वर्षाचा काळ २९. कोर्टातील कथन ३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम ३२. नवरा (ग्रा.) ३५. रमणीय ३६. धुंदी ३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी ४०. श्रीमंत ४१. एक क्षार ४२. रस काढण्याचे यंत्र ४४. चिंतन ४५. अंत:करण ४६. तेज ४८. मध्यभागी ५०. प्रत्येक दिवशी ५२. वांग्याचा खमंग पदार्थ ५३. गुरांचा समुदाय ५४. मऊ ५६. कौरव पांडवांची कथा ५८. पुरुष, शूर पुरुष ५९. समीक्षा ६२. मदनपत्नी ६३. कपटी ६८. एक पालेभाजी ६९. परमेश्वर ७०. चिंता ७२. मिठी ७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा ७४. अजागळ ७६. आशीर्वाद ७९. एकत्रित रडणे ८०. सुगंध ८१. बारावी रास ८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

**उभे शब्द**

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट २. लग्नासाठी जमलेले गणगोत ३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे) ३अ. फुरसत ४. पुन्हा पुन्हा ५. घर ६. आशीर्वाद ७. असुर ८. नामशेष ९. सर्प ११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात १२. अनुमती १४. वाढलेला व्याप १५. वही १७. सोंगट्यांचे वस्त्र १९. झीज, नुकसान २०. पोते २१. दावा २३. हेलपाटा २५. पृथ्वी २६. कुबड २८. घागरा ३०. एकत्र गोळा करणे, जमविणे ३१. श्रीविष्णूचे नावडते फूल ३३. दशमुखी रावण ३४. चाक ३७. एक हिंस्र पक्षी ३८. झोंबणारे ३९. लिहिलेले वाचणारा ४०. सन्मानाची रक्कम ४३. पंकज ४४. माझे ४५. इच्छा ४७. अभिप्राय ४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील ५०. इटलीची राजधानी ५१. लोखंड (हिंदी) ५२. ओहोटीच्या विरुद्ध ५३. पाषणहृदयी ५५. रसदार ५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा ५७. हिंदुस्थान ५८. मौज ६०. फणसाचा एक प्रकार ६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ ६३. गाजावाजा ६४. तोटी ६६. खिडकीची काच ६७. यावर्षी ६८. नोकर ७१. आयुष्य ७५. पुरे! ७७. मादीच्या विरुद्ध ७८. धातूचा जाड-बारीक धागा

### शब्दकोडे १८८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### जायकवाडी ३८% भरल्याने नाशिकचे पाणीसंकट टळले

**नाशिक ।** दोन-तीन दिवसांपासून पावसाने नाशिककरांवर कृपाकेली असून जायकवाडी धरणातील साठा ३८टक्क्यांवर गेल्यामुळे मेंढेगिरी समितीच्याअहवालानुसार, ९० टक्केपर्यंत भरलेल्या गंगापूर धरणसमूहात ६१ टक्के पाणी सोडून उर्वरित २९ टक्के पाणीमराठवाड्यासाठी सोडण्याची वेळ टळली आहे. आता,७४ टक्क्यांपर्यंत पाणी ठेवण्यास मुभा आहे.यानियमानुसार आता मे महिन्यापर्यंत नाशिककरांनापाणी पुरणार आहे. तर मागील अनुभव लक्षात घेताऑक्टोबरअखेरपर्यंत परतीच्या पावसाची कृपाराहिल्यास जायकवाडी धरण ५६ टक्के भरून गंगापूरधरणसमूहात ८२ टक्के पाणी ठेवणे शक्य होणार आहे. मेंढेगिरी समितीच्या अहवालातदिलेल्या पहिल्या पर्यायानुसार आता गंगापूर धरणात ७४टक्के पाणीसाठी ठेवण्यास मुभा मिळते. मागील ४दिवसांच्या पावसामुळे गंगापूर धरण समूहातून सातत्यानेपाण्याचा विसर्ग सुरू आहे.

# भारत सर्वश्रेष्ठ व्हावा हेच मोदींचे स्वप्न

## भाजप प्रदेशाध्यक्ष आ.बावनकुळे यांचे प्रतिपादन | नाशिक लोकसभा प्रवासात पदाधिकाऱ्यांशी संवाद

**नाशिक । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यकाळ सामाजिक न्यायाचा सर्वोत्कृष्ठ काळ असून त्यांनी महिलांना लोकसभेत व विधानसभांमध्ये आरक्षण मिळवून दिले. विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून अठरा पगड जाती व बारा बलुतेदारांना व्यावसायासाठी मदत करण्याची गॅरंटी घेत आहेत. त्यांनी विविध योजनांच्या माध्यमातून नागरिकांचे हक्क अबाधित राहावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. २०४७ पर्यंत भारत सर्वश्रेष्ठ व्हावा हेच मोदींचे स्वप्न असून त्यात प्रत्येकाने सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मंगळवारी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाशिक लोकसभा क्षेत्रात प्रवास केला. 'महाविजय-२०२४' अभियानांतर्गत त्र्यंबकेश्वर येथे घोटी-सिन्नर, देवळाली, त्र्यंबक-इगतपुरी आणि शहरात नाशिक पूर्व, मध्य व पश्चिम या सर्व सहा विधानसभा मतदारसंघातील प्रमुख भाजपा पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण केले. दीनदयाळजींचा अंत्योदयाचा विचार घेऊन मोदी सरकार



लोककल्याणसाठी काम करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना २०२४ च्या निवडणुकीमध्ये जनतेचे समर्थन मिळण्यासाठी अहोरात्र मेहनत घेण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले.

प्रदेशाध्यक्षांच्या दौऱ्यात प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विक्रांत पाटील, आ. देवयानी फरांदे, आ. राहुल ढिकले, आ. सीमा हिरे, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, लोकसभा निवडणूक प्रमुख केदा आहेर, नाशिक शहर भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक दक्षिण भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र गावित, जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ, शरद कासार, काशिनाथ शिलेदार, हिमगौरी आडके, रोहिणी नायडू, जगन्न पाटील, गणेश गिते, गोविंद बोरसे, शिवाजी गांगुर्डे, अनिल भालेराव, सुनील केदार, मनिषा बोडके, अण्णा डोंगरे, सीमा झोले, सुयोग वाडेकर, विष्णू दोबाडे, विठ्ठल जपे, अमृता पवार, भाऊसाहेब कडभाने, पुरुषोत्तम लोहगावकर यांच्यासह सर्व विधानसभा निवडणूक प्रमुख राजेंद्र दराडे, अनिल भालेराव, सुनील देसाई, समन्वयक, मंडल अध्यक्ष तथा जिल्हा कार्यकारिणीतील सदस्य व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

**सर्वसामान्य जनतेशी संवाद**

त्र्यंबकेश्वर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते त्र्यंबक मंदिर परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौकपर्यंत आणि नाशिक शहरात सातपूर पोस्ट ऑफीस ते आनंद छाया सर्कलपर्यंत 'घर चलो अभियानात' सहभागी झाले. यादरम्यान सर्वसामान्य जनतेशी संवाद साधला. या प्रवासात त्यांनी तनुजा घोलप यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले. त्र्यंबकेश्वर येथे श्री त्र्यंबकेश्वर ज्योतीर्लिंगाचे व महामंडलेश्वर रघुनाथ दास महाराज यांचेही त्यांनी दर्शन घेतले.

**कामगार कायद्यात २७ सुधारणा**

पंतप्रधान मोदी यांनी कामगारांचे अधिकार व त्यांना मिळणाऱ्या सुविधांसाठी त्यांच्या कार्यकाळात तब्बल २७ सुधारणा केल्या आहेत. ५५ वर्षांनंतर महिला कामगारांच्या कायद्यात सुधारणा करून न्याय मिळवून दिला आहे. मोदी सरकारने विश्वकर्मा योजना सुरू केली असून त्यामुळे कुशल कामगारांना स्वत:चा व्यवसाय सुरू करता येईल. त्यासाठी कर्ज देण्याची गॅरंटी मोदी यांनी असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी असंघटित कामगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना सांगितले.

२०२४ च्या निवडणुकीत नाशिक व दिंडोरीचा खासदार पंतप्रधान मोदींसाठी संसदेत हात उचाविणार आहे. तर नाशिक जिल्ह्यातील सर्व १५ विधानसभा महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्त्वातील महायुतीचे आमदार निवडून येतील असा विश्वास आ. बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# नाशिकमध्ये १ ऑक्टोबरला रविवारी दातार कुलसंमेलन

**नाशिक । प्रतिनिधी**

सर्व दातार कुटुंबियांचे चौथे कुलसंमेलन नाशिकमध्ये आयोजित करण्यात आले आहे. रविवार, दि.१ ऑक्टोबर रोजी गंगापूररोडवरील प्रसाद मंगल कार्यालय येथे हे संमेलन होईल. सर्व दातार कुलबंधू भगिनींना सहभागी होता येणार आहे.

दातार कुळात आगरकर, आघारकर, कुलकर्णी, वर्तक, फडणीस, सबनीस, दप्तरदार, चौकर यांचाही समावेश आहे. आतापर्यंत माहेरवाशिणींसह अनेकांनी आपला सहभाग नोंदवला आहे. सकाळी ९ पासून संमेलनाला सुरुवात होईल. प्रमुख पाहुणे म्हणून भालचंद्र तथा बाबासाहेब दातार, विनायक रानडे, ॲड. सायली गोखले -आगरकर यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच विजय दातार, सुनीता परांजपे, प्रभाकर केळकर, कल्याणी दातार यांची मार्गदर्शनपर व्याख्याने होतील. यानिमित्ताने एका स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येईल. संमेलनाच्या यशस्वितेसाठी अभिषेक दातार, मेधा दातार, सलील दातार, श्रीराम दातार (दातार कुलमंडळ) आदी परिश्रम घेत आहेत. दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम होतील. दरम्यान शनिवारी (दि.३०) संध्याकाळी बिझनेस मिट आयोजित करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी वैभव आघारकर यांच्याशी ९४२३४८५३८१ या क्रमांकावर संपर्क साधावा व जास्तीत-जास्त कुलबांधव भगिनींनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## जागतिक पर्यटन दिनानिमित्त आज तान द्वारे हेरिटेज वॉक

**नाशिक ।** आज २७ सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिन म्हणून ओळखला जातो. यानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रारंभी ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशन ऑफ नाशिकचे (तान) चे सर्व सभासद, त्यांचा परिवार व मित्रमंडळी यांच्यासाठी नाशिकमध्ये हेरिटेज वॉक आयोजित करण्यात आलेला आहे.

# नाशिक जिल्हा महानुभाव युवा परिषदला परवानगी



### अध्यक्षपदी सुनील मेहकरकर तर उपाध्यक्षपदी सचिन कपाटे

**नाशिक । प्रतिनिधी**

येवला येथे महानुभाव परिषदेच्या वतीने भगवान श्री चक्रधर स्वामी व श्री गोविंद प्रभुअवतार दिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अखिल भारतीय महानुभाव युवा परिषद अंतर्गत नाशिक जिल्हा महानुभाव युवा परिषदेला रितसर परवानगी देण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी सुनील मेहकरकर तर उपाध्यक्षपदी सचिन कपाटे यांची निवड करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय महानुभाव युवा परिषद अध्यक्ष महंत संतोषमुनी शास्त्री (संभाजीनगर), परिषयेचे सदस्य महंत मयंकराज बाबा पंजाबी, अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे उपाध्यक्ष महंत सुकेणेकर बाबा शास्त्री, महंत चिरडे बाबा, अन्न पुरवठामंत्री छगन भुजबळ या मान्यवरांच्या उपस्थितीत नाशिक जिल्हा महानुभाव युवा परिषद कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी युवा परिषदेचे जिल्हाध्यक्ष महंत सुनील मेहकरकर आणि उपाध्यक्ष महंत सचिन कपाटे यांच्या नाशिक जिल्हा महानुभाव युवा परिषदेचे सर्व पदाधिकारी मान्यता पत्र स्वीकारताना उपस्थित होते.

दरम्यान, याप्रसंगी श्री चक्रधर प्रभू अवतार दिन व श्री गोविंद प्रभू अवतार दिनानिमित दोन्ही अवतारांनी केलेले समाजकार्य, अहिंसा, समता, बंधुत्व याविषयीची सर्व मान्यवरांनी विचार मांडले. अशी माहिती युवा परिषदेचे जिल्हा सचिव राजु कपाटे यांनी दिली.

# नाशकातील वाहतुकीची कोंडी सुटण्यासाठी शिवसेनेचा ओपिनियन पोल

### मनपाने नागरिकांच्या सूचनांचा आदर करावा- अजय बोरस्ते

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करत आहे. या समस्येवर मात करण्यासाठी शासकीय पातळीवरील उपाययोजना सोबतच व्यापक जनसहभाग देखील महत्वाचा आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना नाशिक महानगराच्या वतीने सोशल मिडीयाच्या माध्यमातून एक ऑनलाईन ओपिनियन पोल राबवला होता. त्यामध्ये नाशिककरांनी भरभरून प्रतिक्रिया देत विविध प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत.

यासंदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी नाशिक महापालिका आयुक्तांना नागरिकांकडून आलेल्या सूचना एका निवेदनाद्वारे दिल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी केल्यास नाशिक शहरातील वाहतुकीची कोंडी सुटण्यास निश्चित मदत



होणार आहे. तरी त्यांची अंमलबजावणी करावी अशी विनंतीही केली आहे. याप्रसंगी शिवसेना आयटी सेल जिल्हाप्रमुख नितीन देशमुख, युवासेना जिल्हा चिटणीस आदित्य बोरस्ते उपस्थित होते.

दरम्यान नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सूचना या पुढील प्रमाणे आहेत. त्यात पार्किंगसाठी जास्तीत-जास्त जागा उपलब्ध करून देणे- ३२ टक्के, रस्ते रुंद करणे - २६ टक्के, वाहन चालकांनी स्वयंशिस्त पाळणे - १८ टक्के, ट्राफिक पोलिसांची संख्या व कार्यक्षमता वाढविणे - ११ टक्के, पब्लिक ट्रान्स्पोर्टशन अधिक सक्षम करणे - १० टक्के, दिल्लीच्या धर्तीवर सम आणि विषम दिवसांना वाहनांची पार्किंग करणे - ३ टक्के, या व्यतिरिक्तही नागरिकांनी काही अमुल्य सूचना केलेल्या आहेत. या सूचनांचे स्क्रिन शॉटही मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात जोडले आहेत. या या जनतेच्या सूचनांची तसेच भावनांची दखल घेऊन नाशिक शहरातील वाहतूक कोंडीची सामस्या कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी दिर्घकालीन उपाययोजना लवकरात-लवकर राबवाव्यात अशी विनंती शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्ये यांना अभिवादन

**नाशिक ।** जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी उत्कृष्ट संघटनकर्ता तथा मानवतावादी प्रणते पंडित दीनदयाळ उपाध्ये यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष यमुना घुगे, बाळासाहेब घुगे, पुष्पा वाजे, आरती खैरनार, नीता मिश्रा, भक्ती बेलन, पुजा शेवाळे, दिनकर चोथे, राजेंद्र जडे, राहुल वाजे, केशव पाटे यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# 'नामको'तर्फे अवघ्या १०० रुपयांत १० हजारांच्या आरोग्यसुविधा

### पर्यूषण पर्व व गणेशोत्सवानिमित्त आरोग्य संजीवनी कार्ड योजनेचा शुभारंभ

**नाशिक । प्रतिनिधी**



'गरीबांना परवडणारे आणि श्रीमंतांना आवडणारे' ब्रीद घेऊन कॉर्पोरेट दर्जाच्या आरोग्य सुविधा देणाऱ्या शहरातील नामको हॉस्पिटलतर्फे गणेशोत्सव व पर्यूषण पर्वाचे औचित्य साधून सोमवारी (दि.२५) त्र्यंबकेश्वरच्या नियोजित विवेकानंद हॉस्पिटलचे स्वामी श्रीकंठानंद यांच्या हस्ते आरोग्य संजीवनी कार्डचे विमोचन करण्यात आले. या कार्डच्या माध्यमातून नागरिकांना अवघ्या १०० रुपयांत १० हजारांपर्यंतच्या आरोग्य सुविधांचा लाभ घेता येणार असल्याची माहिती नामको ट्रस्टचे अध्यक्ष सोहनलाल भंडारी व सेक्रेटरी शशिकांत पारख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पेठरोडवरील नामको रुग्णालयाच्या सभागृहात आरोग्य संजीवनी कार्डची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी नामको हॉस्पिटलचे उपाध्यक्ष अरुणकुमार मुनोत, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विशाखा जहागिरदार, सीईओ डॉ. लक्ष्मीकांत पाठक, व्यवस्थापकीय अधीक्षक समीर तुळजापूरकर आदींसह तज्ज्ञ डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष भंडारी म्हणाले की, गंगापूर रोडपासून अवघ्या १० मिनिटांच्या अंतरावर असलेल्या नामको रुग्णालयात कॉर्पोरेट दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. आजवर हजारो रुग्णांनी या सुविधांचा लाभ घेत आरोग्य अबाधित ठेवले आहे. आरोग्य सेवेच्या वाटेवरील पुढचे पाऊल म्हणून आम्ही आता अत्यंत महत्वाकांक्षी अशी 'आरोग्य संजीवनी कार्ड' योजना सादर केली आहे. त्यात कुटुंबातील एका सदस्याला अवघ्या १०० रुपयांत, तर एकाच कुटुंबातील चार सदस्यांना केवळ ३०० रुपयांत हे कार्ड घेता येईल. त्यात प्रत्येक सदस्याला १० हजार रुपयांपर्यंतच्या विविध चाचण्या, वैद्यकीय सल्ला व सुविधा, उपचारांत सवलत असा लाभ दिला जाणार आहे.

अधिकाधिक नागरिकांनी 'आरोग्य संजीवनी कार्ड'द्वारे स्वत:सह आपल्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी आरोग्य संरक्षण मिळवून द्यावे व सर्वोत्कृष्ट आरोग्यसेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नामको ट्रस्टचे सेक्रेटरी शशिकांत पारख यांनी केले आहे.

**वर्षभरात या सुविधा मिळणार मोफत**

हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून वर्षभरात १२ वेळा (महिन्यातून एकदा) मोफत तपासणी व सल्ला. त्यात हृदयरोग तज्ज्ञ, जनरल मेडिसिन, शल्य चिकित्सक, स्त्रीरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञांचा समावेश. तर आहारतज्ज्ञांचा ४ वेळा (३ महिन्यांतून एकदा) समुपदेशन व सल्ला एकदा २-डी इको (हृदयरोग तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार). ६ वेळा (२ महिन्यांतून एकदा) ई.सी.जी. १२ वेळा (महिन्यातून एकदा) बी.एस.एल. (ग्लुकोमीटरद्वारे रक्तशर्करा तपासणी), फिजीओथेरपीवर २० टक्के सवलत तर आरोग्य संजीवनी हेल्थ कार्ड योजनेंतर्गत आंतररुग्ण विभागात हॉस्पिटलच्या बिलात १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच इमर्जन्सीमध्ये ॲडमिशनसाठी ॲम्ब्युलन्स सुविधा पुरवण्यात येणार आहे.

ॲड. महेश अ. चव्हाण
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. २ रे सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर धुळे यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११४७/२०२३**

श्रीमती मंगलबाई भीमा माळीच वै. ...अर्जदार

॥ विरुध्द ॥

कोणीही नाही ...सामनेवाला

भीमा उर्फ भिमसिंग पुणा माळीच (भिल) ...(मयत)

ज्या अर्थी अर्जदार यांनी मयत भीमा उर्फ भिमसिंग पुणा माळीच (भिल) हे दि. १७/०७/२०१० रोजी मौजे हेंद्रुण, ता.जि.धुळे येथे मयत झाले. त्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता सदरचा दावा मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद केसचेकामी दि. ०६/११/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे.. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २५/०९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे (शिक्का) अधिक्षक सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे

ॲड. राहुल व्ही. पाटील, धुळे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ११३३/२०२३**

१. पंकज विश्वास वाघ उ.व.-४० वर्ष, धंदा-वकीली.
२. संदीप विश्वास पाटील उ.व.-४३ वर्ष, धंदा-नोकरी
३. प्रविण विश्वास पोटील उ.व.-४५ वर्ष, धंदा-नोकरी,
४. विश्वास बुधाजी वाघ उ.व.-७२ वर्ष, धंदा - सेवानिवृत्त
सर्व रा. अवधान, ता. जि. धुळे. ...अर्जदार

आणि

मा. पोस्ट मास्टर सो, पोस्ट ऑफीस, प्रमोद नगर, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे ...सामनेवाला

कै. वत्सला विश्वास वाघ (मयत)
मृत्यु दि. २५/०३/२०१९
मृत्यु ठिकाण : अवधान, ता. जि. धुळे ...(मयत)

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. वत्सला विश्वास वाघ (मयत) यांचे नावे खालील नमुद रक्कमांचा तपशिल:- **अ.क्र.१**

**तपशिल** - पोस्ट ऑफीस, शाखा, प्रमोद नगर, देवपुर, धुळे
**खाते क्र.**- Computerize Recurring Deposit A/c. क्र. ८८०८५४८९८४
**शिल्लक रक्कम** - खात्यात असलेली एकुण रक्कम रू.१०,६००/- (अक्षरी रू. दहा हजार सहाशे मात्र) व त्यावरील व्याज

वरील रक्कमा व त्यावरील व्याजासह मिळावी म्हणुन सक्सेशन सर्टिफिकेट मिळावे म्हणुन दि.१६/९/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे. कै. वत्सला विश्वास वाघ (मयत) यांना अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहेत.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ६, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :-धुळे
दिनांक. २५/९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे (शिक्का) अधिक्षक दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे

ॲड. तुकाराम एन. मासुळे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ११३८/२०२३**

१. विमलबाई चुडामण देवरे,
उ.वय -६०, धंदा घरकाम, रा. दापुरी, ता. जि. धुळे.
२. मंगलाबाई छोटु भदाणे,
उ.वय - ४४, धंदा घरकाम, रा. मेहेरगांव, ता. जि. धुळे.
३. सुनिता अशोक संदानशिव
उ.वय ४०, धंदा घरकाम, रा. घर नं. १३९, हर्षवर्धन नगर, उल्हासनगर, ता. जि. ठाणे. ...अर्जदार

॥ विरुध्द ॥

कुणीही नाही ...सामनेवाला
कै.चुडामण रतन देवरे ...(मयत)

कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी
Legal Heirship Certificate

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. चुडामण रतन देवरेयांचे कायदेशिर वारस ठरवून मिळणेकामी बॉम्बे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) लयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. ३१/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण् स सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) कोर्ट नं.२ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेख यी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार तन देवरे यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला Legal Heirship Certificate पुढील सुनावणी करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस में, न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २५/०९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे (शिक्का) अधिक्षक सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे

## न्यूज कॉलम

### प्रबोधनासोबत भंडारा, महाप्रसादांची पर्वणी


**धुळे ।** शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी समाज प्रबोधनाचे कार्य चालवले आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबतच रक्तदान शिबिरही पार पडत आहेत. यासह भंडारा आणि महाप्रसादाचेही ठिकठिकाणी आयोजन करण्यात येत आहे. याचा लाभ गणेशभक्त घेत आहेत. पोलीस ठाणे महापालिका, जिल्हा न्यायालय आदी शासकीय कार्यालयांच्या ठिकाणांवरही गणपती बाप्पा विराजमान आहेत.

# 'नको आम्हा आरक्षण... द्या फक्त संरक्षण' : कोंडाजी तालीमतर्फे प्रबोधनपर सजीव देखावा

### महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी

नको आम्हा महिलांना आरक्षण आम्हाला द्या फक्त संरक्षण' या थीमवर आधारित शहरातील गल्ली क्रमांक सहामधील कोंडाजी तालीमच्या श्री दत्तभक्त बालगोपाल मित्रमंडळाने यंदा महिलांच्या सुरक्षेप्रश्नी प्रबोधनात्मक सजीव देखावा साकारला आहे. हा देखावा पाहण्यासाठी महिलांसह गणेशभक्त, नागरिकांची गर्दी होत आहे. श्री दत्तभक्त बालगोपाल मित्रमंडळाला ११९ वर्षांची परंपरा आहे.



मंडळाने या वर्षी 'महिला' या थीमला प्राधान्य देत देखावा सादर केला आहे. गणेशभक्त व प्रेक्षकांचाही या सजीव देखाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अत्याचारग्रस्त महिलेला का मिळतो समाजाकडून नकार व तिरस्कार.. का तिला नाहीये सन्मानाने जगण्याचा अधिकार? आदी प्रश्न देखाव्याद्वारे समाजाला करण्यात आले आहेत. स्त्रीविश्वाचे निरनिराळे पैलू मांडताना समस्यांच्या निराकरणाच्या अनुषंगाने ऊहापोहदेखील केला आहे. गणेशउत्सवा उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक प्रश्नांचे प्रबोधन होऊन सामाजिक स्वास्थ्य सुदृढ करण्याचा प्रयत्न मंडळांनी केला आहे. दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे. गणेशोत्सव काळात देखाव्यांच्या माध्यमातून प्रबोधनाचे काम केले जाते आहे. मागील काही वर्षांपासून खर्चिक आणि स्थिर देखावे तयार करण्यापेक्षा सजीव देखाव्यांवर मंडळांचा भर असल्याचे दिसत आहे. गणेशोत्सवाच्या या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना हात घालत प्रबोधनाचा संदेश देण्याचे काम मंडळांनी केले आहे. सजीव देखाव्यांना भाविकांचा सर्वाधिक प्रतिसाद मिळत आहे.

### देखाव्यासाठी यांचे परिश्रम

'मंडळाचे अध्यक्ष निखिल मोमया, कार्याध्यक्ष चार्ली आखाडे, स्वागताध्यक्ष महेश कालेवार, उपाध्यक्ष अजिंक्य धात्रक, यशराज साळुंखे, कोशाध्यक्ष चेतन धामेचा, सचिव सौरभ भारस्कर, अक्षय गुरव, प्रसिद्धीप्रमुख यश आखाडे, शुभम काळे, करण सूर्यवंशी, पीयूष भारस्कर, सजावटप्रमुख जगदीश सोनार, स्वप्नील शर्मा, संपर्कप्रमुख युवराज कालेवार, पप्पू डापसे, जयेश मगर आदी सजीव देखावा साकारण्यासाठी परिश्रम घेत आहेत.





शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

# स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात 'स्वच्छता रन'

### ग्रामस्थांनी स्वच्छता शपथ घेत केले श्रमदान






**धुळे । प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील चारही तालुक्यांमध्ये रविवारी सकाळी स्वच्छता रन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छतेचा संदेश देत अधिकारी पदाधिकारी,महाविद्यालयीन तरुण तरुणी,ग्रामस्थ धावले. यावेळी सहभागींना स्वच्छता शपथ देण्यात आली. तसेच स्वच्छतेसाठी श्रमदान ही करण्यात आले.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. अश्विनीताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शुभम गुप्ता, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री देवेंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रकांत पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री बाळासाहेब बोटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वच्छता ही सेवा २०२३ ची थीम कचरामुक्त भारत आहे. या मोहिमेअंतर्गत धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यात रविवारी सकाळी स्वच्छता रन हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमास ठिकठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला.

बोराडी ता.शिरपूर येथे तालुकास्तरीय स्वच्छता रनचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी सकाळी करण्यात आला. याप्रसंगी ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी व सफाई कामगार, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला. तसेच ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस शिरपूरचे गटविकास अधिकारी संजय सोनवणे, पंतप्रधान आत्मनिर्भर अभियान संगठनचे जिल्हाध्यक्ष राहुल रंधे, सरपंच सुकदेव भिल, धुळे-नंदुरबार ग.स.बँकेचे संचालक शशांक रंधे, रमण पावरा,विस्तार अधिकारी एस.एस. पवार, एस.एच.मोरे, आर.जे.पावरा, संवाद तज्ज्ञ संतोष नेरकर, वैभव सयाजी, शिक्षण विस्तार अधिकारी आर.के.गायकवाड, डी.पी.बुवा,बी. एस.बुवा,एकनाथ आव्हाड, समीर तडवी, अतुल निकम समन्वयक, मनोहर वाघ, डॉ.अजित पाटील, भागवत पवार, ग्रामपंचायत सदस्य डोंगरसिंग पावरा, हारसिंग पावरा, सतिष पवार, अनिल पावरा, मनोज सत्तेसा, मा.प्राचार्य बी.डी.पाटील, प्राचार्या सुचित्रा वैद्य, डॉ.विकास पाटील, उपप्राचार्य कल्पेश वाघ, रोहीणी रंधे, प्रा.एस.एम.महाजन, प्रमोद पवार,वासुदेव सत्तेसा,

उपस्थित होते. या उपक्रमात युवकांसह महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. यावेळी बोराडी शैक्षणिक परिसरातील मातोश्री बनुमाय कन्या विद्यालय, पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, देशभक्त फकिरा आप्पा देवरे कनिष्ठ महाविद्यालय, बी.फार्मसी महाविद्यालय, आयुर्वेद महाविद्यालयाचे विद्यार्थी,गावातील ग्रामस्थांनी स्वच्छता रन मध्ये सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी गावामध्ये ग्रामसफाई केली. समारोप ग्रामपंचायत कार्यालयाजवळ असलेल्या छत्रपती शिवाजीमहाराज चौकात झाला. सर्व विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य, विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी स्वच्छतेची शपथ घेतली. यावेळी ग्रामपंचायतचे सफाई कामगार, वैद्यकीय कामगारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामविकास अधिकारी डी.आर.पेंढारकर, गणेश भामरे, अंबादास सगरे, लक्ष्मण गोपाळ, प्रा.जे.एल.पावरा, धैर्यशील चव्हाण, प्रा.पंकज पाटील, प्रा.गोपाल राजपुत, वैशाली पवार, धैर्यशील चव्हाण, मुकेश जाधव, प्रकाश वाल्हे, समाधान नगराळे, तुषार गोपाळ, उमेश पावरा, बादल पावरा, सना पावरा, भुषण कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन चंद्रकांत बडगुजर यांनी केले.

# उद्योजकांच्या आंदोलनानंतर वीज मंडळाला आली जाग

### अंबड औद्योगिक वसाहतीसाठी स्वतंत्र सबस्टेशन उभारण्याचे आश्वासन

**नाशिक । प्रतिनिधी**



अंबड औद्योगिक वसाहतीसाठी स्वतंत्र सबस्टेशन उभारण्याचा तसेच उद्योगांना विनाखंड पुरवठा केला जाईल आणि त्यासाठी स्वतंत्र अशी मेन्टेनन्सची व्यवस्था उभारण्यात येईल, असे आश्वासन महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे यांनी दिले.

अंबड औद्योगिक वसाहतीत दीर्घकाळ वीज पुरवठा खंडित झाल्याने गेल्या आठवड्यात उद्योजकांचे मोठे नुकसान झाले होते. आयमाने त्याची तातडीने दखल घेऊन १३२ केव्ही सबस्टेशनवर आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली उद्योजकांनी धडक देऊन ठिय्या आंदोलन केले होते. उद्योजकांवर अशी वेळ पुन्हा येऊ नये यासाठी घ्यावयाच्या खबरदारीच्या उपायोजनांसाठी महावितरण आणि महापारेषणच्या अधिकाऱ्यांना सोमवारी चर्चेसाठी आयमा सभागृहात पाचरण केले होते. यावेळी आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सुदर्शन डोंगरे, सचिव गोविन्द झा, सदस्य हेमंत खोंड, आयमा पॉवर कमिटी चेअरमन रवींद्र झोपे, महावितरण व महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे, अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, माणिक गुट्टे, कार्यकारी अभियंता ललित पाटील, पाटील, सहायक अभियंता गणेश कुशारे आदी उपस्थित होते.

यावेळी उद्योगांना वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यासाठी सविस्तर चर्चा झाली. महावितरण व महापारेषणने उद्योगांना अखंड वीज पुरवठा करावयाचा असेल तर पूर्वीच्या उपाययोजनांची तयारी असायला हवी. उद्योजक कायमस्वरूपी ग्राहक आहे व वेळेवर विजेची बिले भरतात. त्यांना अशा समस्यां उद्भवत कामा नये. उद्योजकांनी विजेची बिले भरली नाहीत तर महावितरण तोट्यात येईल. वीज पुरवठा अखंड कसा ठेवायचा हा तुमचा प्रश्न आहे. उद्योजकांना विशेष प्राधान्यक्रमाने वीज पुरवठा करायला हवा. वीजपुरवठा खंडित झाल्यास उद्योजकांच्या उत्पादनांना ब्रेक लागतो व नाहक आर्थिक भुर्दंड म्हणजे एक लाखावर तेहतीस हजार दंड सोसावा लागतो. ज्यांच्याकडून तुम्ही सेवा घेता त्यांच्याकडून मेन्टनन्सची हमीही घेतली पाहिजे. एका आठवड्यात परदेशातून म्हणजे रशिया, चीन आदी देशातूनही उपाययोजना होऊ शकते. मशिनरी येऊ शकते तर आपल्या येथे सुधारणेसाठी दीर्घ कालावधी का लागतो? याचा विचार करा, अशा शब्दात निखिल पांचाळ यांनी या दोन्ही कंपन्यांच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना सुनावले.

### रोजगार मेळाव्यात सहभागाचे आवाहन

**धुळे ।** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर मार्फत प्रशासकीय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवार, दि. २७ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत रोजगार मेळावा आयोजित केला आहे. ट्रेड अप्रेंटिस, डिप्लोमा धारक तंत्रज्ञ प्रशिक्षणार्थी, उमेदवाराकरीता ६०० रिक्तपदे प्राप्त झाली आहेत.

# इगतपुरीजवळ भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

### दुचाकीवर ट्रिपलसीट, बॅरिकेड्स तोडून ट्रकवर दुचाकी आदळली

**नाशिक । प्रतिनिधी**

मुंबई-नाशिक महामार्गावरील इगतपुरीजवळ (दि.२४) रोजी सकाळच्या सुमारास साई कुटीर परिसरात ट्रिपल सीट असणाऱ्या दुचाकीस्वाराचे मोटारसायकलवरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोन जण जागीच ठार झाले असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ट्रिपल सीट दुचाकीस्वार मुंबईहून नाशिकच्या दिशेने जात होते. यावेळी दुचाकीस्वाराचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी बॅरिगेड तोडून पुढे चालणाऱ्या ट्रकवर पाठीमागून जाऊन जोरदार आदळली. या अपघातात दुचाकीवरील समाधान देवराम भगत, सचिन कचरू पथवे, रा. धार्णोली वैतरणा हे दोघे जण जागीच ठार झाले. तर भाऊ भगत रा. खंबाळे हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच दुचाकीवरील हे तिघेही महिंद्रा कंपनीचे कामगार असल्याचे समजते. दरम्यान,अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक राजु सुर्वे, महामार्ग सुरक्षा पोलीस उपनिरीक्षक हरी राऊत, पोलीस हवालदार विजय रुद्रे यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. यानंतर पोलीसांनी दोन्ही मयत व जखमीला टोल नाक्याच्या रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी इगतपुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, ट्रिपल सीट दुचाकीस्वार मुंबईहून नाशिकच्या दिशेने जात होते. यावेळी दुचाकीस्वाराचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी बॅरिगेड तोडून पुढे चालणाऱ्या ट्रकवर पाठीमागून जाऊन जोरदार आदळली. या अपघातात दुचाकीवरील समाधान देवराम भगत, सचिन कचरू पथवे, रा. धार्णोली वैतरणा हे दोघे जण जागीच ठार झाले. यावेळी घटनास्थळी काही काळ वाहतुक ठप्प झाली होती. मात्र पोलीसांनी तत्परतेने दोन्ही अपघातग्रस्त वाहने बाजुला करून वाहतुक सुरळीत केली. तर पुढील तपास पोलीस निरीक्षक राजु सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.

# एस. एस. व्ही. पी. एस. कला महाविदयालयात एमबीए, एमकॉम इतर पदव्युत्तर प्रवेश सुरु

**धुळे । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एस. एस. व्ही. पी. एस. कला व वाणिज्य महाविदयालयात अभ्यासकेंद्रात पदवीच्या प्रथम द्वितीय तृतीय वर्षे बी. ए. व बी. कॉम , बी. ए. (एम.सी.जे.) व बी. लीब सह पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षे एम. बी. ए., एम.कॉम. एम. ए. (उर्दू), एम. ए. (इतिहास) व डीप्लोमा इन फायर ॲण्ड सेफ्टी इंजिनियरींग हे नवीन अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. या सर्व अभ्यासक्रमातील प्रवेशांची अंतिम वाढीव मुदत ३० सप्टेंबर २०२३ आहे. विद्यार्थ्यांनी सदर मुदतीच्या आत आपला प्रवेश निश्चित करावा. अभ्यासकेंद्र येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य तथा केंद्रप्रमुख डॉ. मनोहर पाटील व केंद्रसंयोजक प्रा. शशिकांत जे. बोरसे यांनी केलेले आहे.

# महाराणा प्रताप बाल गोपाल गणेश मित्र मंडळाच्या बाप्पाचे विसर्जन

**चिमठाणे । प्रतिनिधी**

चिमठाणे येथील गिरासे गल्लीत श्री महाराणा प्रताप बाल गोपाल मित्र मंडळ हे गेल्या चार वर्षा पासून गणेश उत्सवाचे आयोजन करतात.

दर वर्षी हे बाल गोपाल धार्मिक कार्येक्रम देखील करतात भारूड, भजन, कीर्तन व महाप्रसादाचा देखील आयोजन असते. सातव्या दिवशी गणपती बाप्पा च्या विसर्जनासाठी डी. जे. च्या तालावर सर्व श्री महाराणा प्रताप बाल गोपाल गणेश मित्र मंडळ यांनी ठेका घेत शांततेत विसर्जन मिरवणूक केली. या बाल गोपाळांना रवींद्र गिरासे , रवी गिरासे, धनसिंग गिरासे, बंटी गिरासे, संदीप गिरासे, भावेश गिरासे तसेच विठ्ठल मंदिर भजनी मंडळ यांचे सहकार्य करत असतात. भटू गिरासे ,सौरव गिरासे इशू गिरासे ,वरून गिरासे,मयूर गिरासे,ओम शिंपी ,हर्षल गिरासे,रोशन गिरासे चेतन गिरासे, नैतिक गिरासे, हर्षल गिरासे,कोहिनुर गिरासे तसेच श्री महाराणा प्रताप बाल गोपाल गणेश मित्र मंडळ चे सर्व सदस्य परीक्षम घेतात.



# मेरी मिट्टी मेरा देश व सेवा पंधरवडा अंतर्गत अमृत कलश यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### भारत माता की जय, वंदे मातरमचा जयघोष

**शिरपूर । प्रतिनिधी**




भारतीय जनता पार्टी, शिरपूर विधानसभा तर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७३ व्या वाढदिवसा पासून आयोजित मेरी मिट्टी मेरा देश व सेवा पंधरवडा अंतर्गत प्रमुख मान्यवरांसह शिरपूर तालुक्यातील माजी सैनिकांच्या उपस्थितीत शिरपूर येथील आमदार कार्यालयात २४ सप्टेंबर २०२३ रोजी भारत माता की जय, वंदे मातरम च्या जयघोषात 'अमृत कलश यात्रा' सोहळा आयोजित करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, भाजपा शिरपूर तालुका प्रभारी प्रभाकरराव चव्हाण, जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष किशोर माळी, शहराध्यक्ष हेमंत पाटील, शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के. डी. पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नारायणसिंग चौधरी, भटू माळी मांडळ, 'शिरपूर तालुका माजी सैनिक व विधवा सैनिक पत्नी संघ' अध्यक्ष कॅप्टन सुरेश निकम, बाबुलाल महाले, संतोष माळी, विकी चौधरी, धीरज देशमुख, असंख्य माजी सैनिक, नागरिक, भाजपाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यावेळी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गौरवशाली नेतृत्वामुळे भारत देशाला संपूर्ण जगात सन्मान मिळाल्याची बाब आपल्या सर्वांसाठी भूषणावह आहे. देशभरातील सैनिकांना व माजी सैनिकांना त्यांच्यामुळे मोठा सन्मान मिळत असल्याने तसेच शिरपुरात आज मेरी मिट्टी मेरा देश अंतर्गत अमृत कलश यात्रा सोहळ्यात सर्व माजी सैनिकांना भेटल्याने मनापासून आनंद वाटत आहे. सामाजिक क्षेत्रात आपण मोठे काम करतोय. अत्याधुनिक हॉस्पिटल मधून आपण हजारो रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी प्रयत्नशील आहे. माजी सैनिकांसाठी योग्य काम करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे असेही भाई म्हणाले.

शिरपूर आमदार कार्यालयात २४ सप्टेंबर २०२३ सकाळी १०.३० वाजता कार्यक्रमात भाजपा शिरपूर तालुका प्रभारी प्रभाकरराव चव्हाण यांनी प्रासविकात मेरी मिट्टी मेरा देश अंतर्गत अमृत कलश यात्रेबद्दल सविस्तर विवेचन केले. माजी सैनिक बाबुलाल महाले, यांनीही मनोगत व्यक्त केले करून भाईंच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर आमदार कार्यालयात भाजपातर्फे माजी सैनिकांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल तसेच अमृत कलश यात्रेच्या आयोजनाबद्दल आभार मानले. कार्यक्रमात भाजपा माजी सैनिक आघाडी अध्यक्ष पदावर माजी सैनि सुशील भटू सोनवणे (मांडळ) यांची नियुक्ती करण्यात येऊन त्यांना माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## घर विकणे आहे

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

बुधवार, दि. २७ सप्टेंबर २०२३





# राज्यातील सत्तांतरावर देखाव्यातून भाष्य

## धुळेकर नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद
























धुळे
। शहरातील भगवा चौक गणेश मंडळ आयोजित गलीच्छ राजकारण आणि बोलघेवड्या योजनांचा भांडाफोड सजीव देखाव्यास धुळेकर नागरिकांचा  उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. देखावा संपल्यानंतर रवी बिवाल डान्स ग्रुपसाठी टाळ्यांचा कडकडाट देखील होतो आहे. भगवा चौक गणेश मंडळ गलीच्छ राजकारण व बोलघेवड्या योजनांचा भांडाफोड सजीव देखाव्याचे उद्घाटन ज्यांनी पहिल्यांदा भगवा चौक गणपती बसवला होता विजय(पिंटू)गोरे, गणेश मंडळ अध्यक्ष मनोज गवळी,खजिनदार प्रविण मूर्तडकर,दीपक गोरे, आप्पा भडागे, दत्तात्रय गोरे, मनोज भाऊ धात्रक, बाळूभाऊ पाटील, सलीम भगवा यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आयोजक ऍड.पंकज गोरे, उपाध्यक्ष बंटी गोरे, दर्शन चौधरी, धनंजय दीक्षित, सागर गोरे, ज्ञानेश्वर देवरे, जयवंत गोरे, गोकुळ  येलमामे, आशु भडागे,भावेश अहिरराव, सोनू मुर्तडक, सौरभ जवराळ, प्रेम सोनार,मयुर सोंजे,अक्षय लाड, योगेश वाघ, संकेत पाचपुते, नयन शाह,सिध्दार्थ गोरे, विक्की गर्ग, विष्णू प्रजापत, मयुर कुलकर्णी, सागर मोरे, सिद्धर्थ गोरे, दर्शन कंबायत, सिद्द्धार्थ नंदकुमार गोरे, सागर भडागे,पवन खांडरे,आशीष गोरे, प्रेम वराडे, अमोल रणमळे,रवी बिवाल डान्स ग्रुप यांच्यासह भगवा चौक पदाधिकारी सर्व सदस्य उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र



# सोनगीर परिसरातील गणेश दर्शन

## विलोभनीय गणेश मुर्ती आणि देखावे पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी



नवयुवक गणेश मित्र मंडळ



वीर भगत सिंह मित्र मंडळ



विश्वकर्मा गणेश मित्र मंडळ




जय बजरंग गणेश मित्र मंडळ



पाटील समाज गणेश मित्र मंडळ




अहिल्याबाई होळकर गणेश मित्र मंडळ



शबरी माता गणेश मित्र मंडळ



वीर एकलव्य गणेश मित्र मंडळ




मोरया गणेश मित्र मंडळ

संकलन : रोशन जैन सोनगीर